# प्रेसनोट

दि.०७/०३/२०२५

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहिल्यानगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | कोपरगांव शहर पो.स्टे., जि.अहिल्यानगर गुरनं.९१/२०२५ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७, ७(अ), १२ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | १)धनंजय गुलाबराव पऱ्हाड, तलाठी सजा धारणगांव, वर्ग–३,ता.कोपरगांव, जि.अहिल्यानगर रा.फ्लॅट नं.१२,साईप्रभा रेसिडेन्सी,रिध्दी सिध्दी नगर,कोपरगांव,ता.कोपरगांव, जि.अहिल्यानगर<br>२)खाजगी इसम सागर उर्फ बबलू सुरेश चौधरी, वय–२७ वर्ष, रा.धारणगांव, ता.कोपरगांव, जि.अहिल्यानगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | २०,०००/– रूपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | २०,०००/– रूपये |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, तक्रारदार यांचा वाळू व्यवसाय असून त्यांचा मागील पंधरा दिवसापूर्वी एक वाळू वाहतुकीचा ट्रॅक्टर पकडला होता. त्यावर दंडात्मक कारवाई करण्यात आली होती. परंतु यापुढे वाळू वाहतूकीच्या ट्रॅक्टर वर कारवाई न करण्यासाठी आरोपी लोकसेवक धनंजय गुलाबराव पऱ्हाड, तलाठी सजा धारणगांव, ता.कोपरगांव, जि.अहिल्यानगर यांनी २०,०००/– रुपये लाचेची मागणी केलेबाबतची तक्रार दि.०५/०३/२०२५ रोजी प्राप्त झाली होती. त्यानुसार दि.०५/०३/२०२५ रोजी लाच मागणी पडताळणी करण्यात आली. लाच मागणी पडताळणी कारवाई दरम्यान आरोपी लोकसेवक धनंजय गुलाबराव पऱ्हाड यांनी तक्रारदार यांच्याकडे पंचासमक्ष वाळू वाहतुकीच्या ट्रॅक्टरवर कारवाई न करण्यासाठी आरोपी लोकसेवक क्र.१ यांनी स्वत:साठी व मंडळ अधिकारी पोकळे यांच्यासाठी २०,०००/– रुपये लाचेची मागणी केली व स्वीकारण्याचे मान्य केले. दि.०६/०३/२०२५ रोजी आयोजित सापळा कारवाई दरम्यान आरोपी लोकसेवक धनंजय गुलाबराव पऱ्हाड यांचे सांगण्यावरुन खाजगी इसम सागर उर्फ बबलू सुरेश चौधरी यांनी तक्रारदार यांचेकडुन पंचासमक्ष लाच रक्कम २०,०००/– रुपये स्वीकारले असता त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे. सापळा कारवाई नंतर आरोपी लोकसेवक क्र.१ धनंजय गुलाबराव पऱ्हाड यांना संशय आल्याने ते मिळून आलेले नाहीत. त्यांचा शोध घेऊन अटक करण्याची तजवीज ठेवलेली आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहिल्यानगर

संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in

ई–मेल :– acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार

ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :– १०६४

दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक :– ९९३०९९७७००

(अजित त्रिपुटे)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
अहिल्यानगर